Pimpri Chinchwad Police Commissionerate

## प्रेसनोट दिनांक १९/०६/२०२१

# दरोडयाचे टोळीचा मोहरक्यास धुळे येथून अटक

# खंडणी विरोधी पथक, गुन्हे शाखा यांची कामगिरी

दिनांक २३/०५/२०२१ रोजी रात्रौ १०/३० रोजी वाचे सुमारास मौजे सावरदरी, ता. खेड, जि. पुणे येथील तौरॉल इंडीया प्रा.लि. कंपनीचे येथील कंपनीचे सिक्युरिटी गार्डास जबरदस्तीने पकडून ठेवून त्यास चाकूचा धाक दाखवून हाताने माराहाण करुन, धमकी देवून ५-७ इसमांनी दरोडा टाकून कंपनीतील ॲल्युमिनिअम उत्पादनाकरीता लागणारे चिल्सचे सुट्टे भाग किं रु १,००,०००/- चा माल चोरुन नेत असतांना ०४ आरोपींना अटक करुन त्याबाबत चाकण पोलीस ठाणे गुरनं. ६१४/२०२१ भादवि कलम ३९५,४४७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदरचा गुन्हा दाखल झालेपासून सदर गुन्हयातील **मुख्य सुत्रधार व टोळीचा मोहरक्या रशिद शेख** हा फरार झाला होता. तो पोलीसांना गुंगारा देत संगमनेर, राहता, अहमदनगर माजलगाव, बीड, परभणी, औरंगाबाद, जालना, बुलढाणा, अजमेर, राजस्थान, धुळे परिसरात स्वतःचे अस्तिव लपवून राहत होतो.

खंडणी विरोधी पथकातील पोलीस **उप-निरीक्षक महेंद्र पाटील** व **पो.हवा. सुनिल कानगुडे** यांना त्यांचे बातमीदारा मार्फत बातमी मिळाली कि, **चाकण पोलीस स्टेशन गुन्हा रजि. नंबर ६१४/२०२१ भादवि कलम ३९५, ४४७ व चाकण पोलीस ठाणे गुरनं. १३२/२०२१ भादवि कलम ४५४,४५७,३८०,३८१,४११ अन्वये दाखल गुन्हयातील पाहिजे आरोपी रशिद शेख** हा मोहाडी, धुळे परिसरात आहे अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने खंडणी विरोधी पथकातील अधिकारी व अंमलदार हे मोहाडी, धुळे परिसरात जावून शोध घेतला असता आरोपी रशिद शेख हा धुळे-जळगाव हायवे रस्त्यावर गौरव हॉटेल समोर, मोहाडी, धुळे या ठिकाणी मिळुन आल्याने त्यास दिनांक १८/०६/२०२१ रोजी ताब्यात घेवुन, त्यास नाव पत्ता विचारता त्याने त्याचे नाव रशिद छोटुमियॉ शेख वय ५२ वर्षे रा. खंडोबा माळ चाकण ता.खेड जि.पुणे असे असल्याचे सांगितले. त्याचेकडे सदर दाखल गुन्हयाबाबत चौकशी करता त्याने दाखल गुन्हयाची तोंडी कबुली दिल्याने त्यास पुढील कारवाई कामी महाळुंगे पोलीस चौकी येथे हजर केले आहे. आरोपी हा पोलीस रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार असुन त्याचेवर पुणे ग्रामीण, पुणेशहर, पिंपरी चिंचवड या ठिकाणी चोरी घरफोडी फसवणुक, चोरीचा माल घेणे मारामारीचे असे **१० गुन्हे** दाखल आहे.

**सदरची कारवाई पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्त श्री. कृष्ण प्रकाश, अपर पोलीस आयुक्त श्री.रामनाथ पोकळे, पोलीस उप-आयुक्त श्री. सुधीर हिरेमठ, सहा. पोलीस आयुक्त डॉ. प्रशांत अमृतकर यांचे मार्गदर्शनाखाली खंडणी विरोधी पथकाचे पोलीस उप-निरीक्षक महेंद्र पाटील शाकीर जिनेडी तसेच पोलीस अंमलदार सुनिल कानगुडे संदीप पाटील, आशिष बोटके, अशोक गारगोटे, शैलेश मगर, अशोक दुधवणे, किरण काटकर, निशांत काळे, प्रदीप गोडांबे, सुधीर डोळस, नागेश माळी यांचे पथकाने केली आहे.**